**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ७० विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २२७** **दिनांक - २१/११/२०२५**

**विभाग – सार्व. बांध. विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** – अहिल्यानगर महानगरपालिका अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०२५-२६ अंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील एकुण ०३ कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सादर करणेबाबत

- -**--

**ठराव** – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, अल्पसंख्याक विकास विभागाने सन २००८-०९ या वर्षापासून राज्यातील अल्पसंख्याक बहल नागरी क्षेत्रांकरिता क्षेत्रविकास कार्यक्रम कार्यान्वित केला असून येथील शासन निर्णयान्वये ही योजना सन २०१५-१६ या वर्षात राबविण्यास मंजूरी देण्यात आली आहे. तसेच संदर्भ कर येथील शासन पुरकपत्रान्वये दि १८ जून, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील योजनेची कार्यपध्दती या शीर्षाखाली परिच्छेद (ब) च्या पढे परिच्छेद दाखल करण्याचा निर्णय शासन मान्यतेने घेतला आहे. त्यानुसार मा. खासदार, मा. आमदार, अन्य मा.लोकप्रतिनिधी व जिल्हाधिकारी यांच्याकडून महानगरपालिका / नगरपालिका/नगरपंचायत / म्हाडा / सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून प्राप्त प्रस्तावांमधील विकास कार्मांना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अन्यसंख्याक बहुल नागरी क्षेत्रविकास योजनेकरिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात "मागणी क्र. झेडई १. मुख्यलेखाशिर्ष २२३५. सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०७) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात क्षेत्रविकास योजनेकरिता सहायक अनुदान (कार्यक्रम) (२२३५-ए-१३१) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित रु.१३३.०० कोटी अधिक पुरवणी मागणीन्वये मंजूर रु.१००.०० कोटी याप्रमाणे एकूण रु.२३३.०० कोटी एवढा निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार, जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी मंजूर विकास कामाची प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही सात्काळ करावी. संबंधित महानगरपालिका/ म्हाडा/नगरपालिका/नगरपंचायत / सार्वजनिक बांधकाम विभागांना मजूर करण्यात आलेले अनुदान वितरित करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी, नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविलेली कामे इतर योजनेतून करण्यात आलेली नाहीत, याची शहानिशा व खातरजमा संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावी व जर सदर काम इतर योजनेतून मंजूर केले असल्यास, त्या बदल्यात सदर योजनेतील इतर काम मंजूर निधीच्या मयदित राहून बदल करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना राहतील. पाबाबतची सर्व कागदपत्रे संदर्भाधीन शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार प्राप्त करून घेण्याची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावी. त्यानंतर त्यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात यावी व निधी संबंधित महानगरपालिका / म्हाडा /नगरपालिका / नगरपंचायत / सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सुपूर्द करण्यात

यावा, तसेच सदर कामे महानगरपालिका / म्हाडा / नगरपालिका / नगरपंचायत / सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रितसर करुन घेण्यात यावीत. शासन निर्णयातील अनुज्ञेय सुविधेतील विकासकामांच्या आराखड्याला व सविस्तर अंदाजपत्रकाला मान्यता दिली असल्यास त्याप्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करावा असे नमूद आहे.

**योजनेची कार्यपध्दती -**

अ) योजनेंतर्गत अनुदान मिळण्यासाठी संबंधित अल्पसंख्याक बहुल महानगरपालिका /नगरपालिका / नगरपंचायतींना प्रस्ताव सादर करतांना अनुसरावयाची कार्यपध्दतीः या योजनेंतर्गत अनुदान मिळण्यासाठी संबंधित महानगरपालिका नगरपालिका/नगरपंचायत यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात हाती घ्यावयाच्या विकासकामांचे सविस्तर प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी

यांच्याकडे दि. १५ सप्टेंबर पर्यंत सादर करावेत. महानगरपालिका नगरपालिका/नगरपंचायतींनी सादर करावयाच्या प्रस्तावात खालील

**कागदपत्रांचा समावेश असेल:**

i) या शासन निर्णया सोबतचे प्रपत्र "अ" परिपूर्णरित्या भरुन क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत विकासकाम हाती घेण्यास संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायतींच्या सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेल्या ठरावाची प्रत. iii) क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या विकासकामांचे सविस्तर अंदाजपत्रक.

(iv) या पूर्वी संबंधित महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतीस क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत शासनाकडून अनुदान मंजुर करण्यात आले असल्यास अनुदानाच्या विनियोगाबाबतचे उपयोजिता प्रमाणपत्र / सदर अनुदानातून हाती घेण्यात आलेल्या विकासकामांबाबतचा प्रगती अहवाल (झालेल्या खर्चासह)

ब) संबंधित अल्पसंख्याक बहुल महानगरपालिका/नगरपालिका / नगरपंचायतींनी क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत प्रस्ताव सादर करताना अनुपालन करावयाच्या अटी व शर्ती: १) ज्या क्षेत्रात विकास कामे हाती घ्यावयाची आहेत त्या क्षेत्रात अल्पसंख्याकांची लोकसंख्या किमान १०% आहे. याबाबत संबंधित आयुक्त, महानगरपालिका, संबंधित मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगरपंचायत यांनी खातरजमा करावी व या योजनेंतर्गत निधीचा विनियोग होईल असे पहावे.

१) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात हाती घ्यावयाच्या विकास कामांचा प्रस्ताव तयार करताना संबधित आयुक्त, महानगरपालिका, संबंधित मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायत यांनी त्या क्षेत्रातील अल्पसंख्याक समाजाच्या मुलभुत व निकडीच्या गरजा लक्षात घ्याव्यात. तसेच याआधी शासनाकडुन ज्या प्रयोजनासाठी/ विकासकमांसाठी निधी मंजूर करण्यात आला होता, सदर प्रयोजने / विकासकामे वगळुन अन्य योजनांसाठी अनुदानाची मागणी केली जाईल, याची दक्षता घ्यावी.या योजनेतून अल्पसंख्याक समाजाचा सामूहिक लाभ होईल अशी सार्वजनिक हिताचीच विकासकामे हाती घ्यावीत, वैयक्तिक लाभाच्या योजना हाती घेणे कटाक्षाने टाळावे.

क) अल्पसंख्यांक बहुल महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत यांच्या कडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी व अनुदानासाठी शिफारस संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत यांच्याकडून विकासकामासाठी वितरित अनुदानाचे उपयोजिता प्रमाणपत्र तसेच चालू वर्षाकरिता या योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या नवीन प्रस्तावांची छाननी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून केली जाईल. छाननी दरम्यान ज्या महानगरपालिका/नगरपालिका / नगरपंचायती यांच्या प्रस्तावांमध्ये काही त्रुटी आढळून येत असल्यास या संदर्भातील आवश्यक कागदपत्रे यांची १५ दिवसांच्या आत पुर्तता करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून संबंधितांना कळविण्यात येईल. तद्वंतर संबंधित जिल्हाधिकारी यांनी सर्व परिपूर्ण प्रस्ताव (संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत यांच्या मूळ प्रस्तावासह) आपल्या शिफारशीसह दि.३० सप्टेंबर पर्यंत अल्पसंख्यांक विकास विभागास सादर करावेत. अपूर्ण प्रस्तावांना शासनाकडून अनुदान देण्यात येणार नाही. संबंधित जिल्हाधिकारी यांच्या शिफारशीशिवाय शासनास परस्पर प्राप्त झालेल्या

महानगरपालिका / नगरपालिका/ नगरपंचायत यांचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, तसेच या पूर्वीच्या वर्षात क्षेत्रविकास महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतीना शासनाकडून अनुदान मंजुर करण्य आले आहे, अशा महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायती यांनी निधीच्या विनियोगाबाबतची उपयोजिता प्रमाणपत्रे चालू वर्षाकरिताच्या प्रस्तावासोबत न पाठविल्यास अशा महानगरपालिका/नगरपालिका / नगरपंचायती यांना निधीच्या विनियोगाबाबतची उपयोजिता प्रमाणपत्रे चालू वर्षाकरिता प्रस्तावासोबत न पाठविल्यास अशा महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायती यांना निधी वितरीत केला जाणार नाही, याची नोंद संबंधित जिल्हाधिकारी, संबंधित आयुक्त, महानगरपालिका आणि संबंधित मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपंचायत यांनी घ्यावयाची आहे.

ड) अनुदान वितरणः संबंधित महानगरपालिका नगरपालिका / नगरपंचायत यांनी पाठविलेल्या विकासकामांच्या प्रस्तावांची छाननी संबधित जिल्हाधिकारी यांनी केल्यानंतर त्यांच्यामार्फत शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाची अंतिम) छाननी शासनस्तरावर करण्यात येईल. तद्नंतर विहित निकर्षानुसार अनुदान मिळण्यास पात्र असलेल्या संबंधित महानगरपालिका/नगरपालिका / नगरपंचायत यांना मागणीनुसार परंतु अनुदानाच्या कमाल विहित मर्यादेपेक्षा जास्त नाही, अशा तऱ्हेने अनुदान मंजुर केले जाईल. त्या जिल्हयातील अल्पसंख्याक बहुल महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायतींना मंजुर करण्यात आलेले अनुदान संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना शासनाकडून वितरीत केले जाईल. तद्नंतर या अनुदानाचे वाटप संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत यांना केले जाईल.

इ क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत अल्पसंख्याक बहुल महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतींना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानाच्या विनियोगाबाबतची उपयोजिता प्रमाणपत्रे व विकासकामांची छायाचित्रे शासनामार्फत अनुदान मंजूर करण्यात आल्यानंतर ०६ महिन्याच्या आत संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/ 1/नगरपालिका/ नगरपंचा नगरपंचायती यांनी प्रस्तावात नमूद केलेली कामे पूर्ण करणे आवश्यक आहे व याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे (या शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र व मध्ये विहित केलेल्या नमुन्यात) आणि विकासकामांची छायाचित्रे संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत अल्पसंख्यांक विकास विभागाकडे सादर करणे अनिवार्य असेल. तसेच ज्या प्रयोजनाकरिता निधी मंजूर करुन वितरित केला आहे. त्याच प्रयोजनार्थ सदर निधी खर्च करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत अन्य प्रयोजनाकरिता सदर निधी खर्च केल्यास सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर विनाविलंब कारवाई करण्यात येईल.

अल्पसंख्याक विकास विभागाच्या क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत ज्या अल्पसंख्याक बहुल महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत यांना अनुदान मंजूर करण्यात येईल, त्या महानगरपालिका /नगरपालिका / नगरपंचायती यांनी अनुदानातून पूर्ण केलेल्या कामाच्या ठिकाणी राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाकडून क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून हे विकासकाम पूर्ण करण्यात आले आहे अशा आशयाचा फलक कामाच्या ठिकाणी ठळकपणे निदर्शनास येईल अशा पध्दतीने लावावा.

ई) भेटी : विकासकाम ज्या ठिकाणी हाती घेण्यात आले आहे, त्या स्थळास शासन प्रतिनिधींच्या प्रासंगिक शासन निर्णय क्रमांक क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६/का.१, क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत अल्पसंख्याक बहुल महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायत क्षेत्रात हाती घेण्यात आलेल्या अथवा पूर्ण झालेल्या विकासकामांची पाहणी करण्याकरिता शासनाचे अधिकारी प्रत्यक्ष कामाच्या स्थळास प्रासंगिक भेटी देतील कामाच्या प्रगतीची दर्जाची तपासणी करून त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल शासनास सादर करतील.

सदर शासन निर्णयात नमूद असलेल्या विकास कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | तांत्रिक मान्यता रक्कम ( रूपये लाखात ) |
|---|---|---|
| १ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मार्केट यार्ड कोठी रोड ते पार्श्वनाथ सोसायटी मुख्य रस्ता विकसित करणे | ६७.०० |
| २ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील जैन पार्क ते मुथा घर ते सीताबन लॉन परिसरापर्यत रस्ता करणे. | ६६.०० |
| ३ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील छाजेड पर ते अरिहंत कॉलनी से ताठेड घर परिसरापर्यंत रस्ता करणे | ६७.०० |

तरी उक्त योजनेअंतर्गत प्रस्तावित विकास कामाचे रक्कम रू. २,००,००,०००/- ( अक्षरी रक्कम रू. दोन कोटी मात्र ) चे खर्चास व मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचेकडेस सादर करणेस मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ७० विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २२६** **दिनांक - २१/११/२०२५**

**विभाग — प्रभाग समिती क्र.२**

---

**प्रस्तावाचा विषय** — अहिल्यानगर महानगरपालिका माळीवाडा वेस निष्काशीत करणे बाबत.

- -**--

**ठराव** — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, माळीवाडा वेस स्थलांतरीत / काढण्या बाबत माळीवाडा पंचमंडळ देवस्थान धर्मफंड ट्रस्ट उपाध्यक्ष श्री. पंडीत खरपुडे व सचिव श्री. आशोक कानडे यांनी दि. २९/१०/२०२५ रोजी अर्ज देवून "श्री. विशाल गणपती मंदिर असल्याने तसेच सदर ठिकाणी चतुर्थी, गणेश उत्सव गणेश उत्सव व इतर मिरवणुकी त्याच मार्गावरून जातात तसेच माळीवाडा वेस परिसरात अवैध बांधकाम, होडींग बोर्ड व अतिक्रमणे सतत होत असतात म. फुले रोड, अमन पाटील रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, मध्यवर्ती एस.टी स्टॅण्ड, क्रिडा संकुल, लक्ष्मी माता मंदिर, शनी मंदिर व शाळा असल्याने सतत गर्दी होत असते. त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होते तरी माळीवाडा वेस स्थलांतरीत करावी." अशी मागणी केली आहे. महालक्ष्मी तरुण मंडळ ट्रस्ट, माळीवाडा अध्यक्ष श्री. मनेष साठे यांनी दि. ०४/११/२०२५ रोजी अर्ज देवून " माळीवाडा वेस चे बांधकाम हे अनेक वर्षे जुने असल्याने ती केव्हाही पडू शकते माळीवाडा वेस काढल्यास वाहतूक कोंडीचा प्रश्न सुरळीत होईल तरी माळीवाडा वेस काढण्यात यावी." अशी मागणी केली आहे. श्री. कपिलेश्वर मित्र मंडळ ट्रस्ट, अध्यक्ष, श्री. ओंकार गिरवले यांनी दि. ३०/१०/२०२५ रोजी अर्ज देवून "माळीवाडा वेस चे बांधकाम हे अनेक वर्षे जुने असल्याने ती केव्हाही पडू शकते तरी माळीवाडा वेस काढण्यात यावी." अशी मागणी केली आहे. तर माळीवाडा तरुण मंडळ ट्रस्ट, गणपतीची तालीम अध्यक्ष श्री. निलेश खरपुडे व उपाध्यक्ष श्री. मयुर भापकर यांनी दि. ०१/११/२०२५ रोजी अर्ज देवून "माळीवाडा वेस काढल्यास वाहतूक कोंडीचा प्रश्न सुरळीत होईल तरी माळीवाडा वेस काढण्यात यावी." अशी मागणी केली आहे.

तरी उपरोक्त प्राप्त अर्जानुसार सदर ठिकाणाची पाहणी केली असता, माळीवाडा भागातील माळीवाडा वेस परिसरात श्री. विशाल गणपती मंदिर असल्याने तसेच सदर ठिकाणी चतुर्थी, गणेश उत्सव व इतर मिरवणुकी त्याच मार्गावरून जातात त्यामुळे गणपती मंदीर परिसरात भावीकांची गर्दी नेहमीच होते तसेच जवळच एस.टी. स्टॅण्ड असल्याने परगावच्या नागरीकांची ये-जा असल्यामुळे सदर भागात वाहतूक कोंडी निर्माण होते तसेच माळीवाडा वेस च्या बाजुलाच श्री. शनिदेव व मारुती मंदिर असल्याने नागरीकांची दर्शनासाठी नेहमीच गर्दी होत असते. जवळच महानगरपालिकेचा दवाखाना (म. फुले आरोग्य केंद्र) असल्याने रुग्णांची वर्दळ तर माळीवाडा परिसरात ब-याचश्या शाळा जसे की, फिरोदया हायस्कूल, म. फुले प्रा. शाळा, गुगळे कॉलेज इ. असल्याने शाळकरी मुला-मुलींची वर्दळ या भागात मोठ्या प्रमाणात असते. तसेच येथे अनेक विक्रते व व्यवसायीकांच्या टप-यांमुळे अतिक्रमण होवून तेथील रस्ते अरुंद झाले आहेत.

त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होत असल्याने तसेच विविध ट्रस्ट व संघटना नी केलेल्या मागणी नुसार  अहिल्यानगर महानगरपालिका माळीवाडा वेस निष्काशीत करणेबाबत विभागाने वृत्तपत्रा मध्ये जाहिर प्रकटन करण्यास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| ( सही ) | ( सही ) |
| ( मेहेर लहारे ) | ( यशवंत डांगे ) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |